# INDIA@75



Editor

**Dr. Sandip B. Kale**

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

# INDIA@75

Editor
Dr. Sandip B. Kale

Aadhar Publications, Amaravati

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

# INDIA@75

■ **Dr. Sandip B. Kale**

■ ***First published,* – : 15th August – 2022.**

© **Editor**

■ **Published by**

Prof. Virag Gawande for

Aadhar Publications,

Behind Govt. VISH,

New Hanuman Nagar,

Amravati – 444 604.

■ **Printed by**

Aadhar Publications,

■ Notice

**The editor, publisher, owner, printer will not be responsible for the articles published in this issue. The articles published in this issue are the personal views of the authors.**

■ Price : 400/-

■ **ISBN-** 978-93-91305-60-4

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेख | लेखक | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | Notable Achievements of India on the Occasion of Azadi Ka Amrut Mahastsav | **Dr. Ashok Gangaram Sabne** | 1 |
| 2 | Gandhi and his Ideas of Economic Development for the livelihood through the Decentralized Industries. | **Shri. Arijit Chakraborty** | 9 |
| 3 | Indian Freedom Movement and Dr Babasaheb Ambedkar | **D.S.Shambharkar** | 16 |
| 4 | भारतीय स्वातंत्र्य लढयात स्वातंत्र्य सेनानी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे योगदान | **प्रा. डॉ. नंदा पांगुळ—बाराहाते** | 22 |
| 5 | उदारीकरण आणि राज्यांची भूमिका | **गायकवाड प्रतिभा शिवाजी** | 28 |
| 6 | जागतिक शांतता | **Sudhakar Kambale** | 34 |
| 7 | म.गांधी : स्वातंत्र्य आंदोलनातील योगदान | **प्रा. डॉ.आंधळे बी.व्ही.** | 40 |
| 8 | महात्मा जोतिबा फुलेजी का नारीवादी कार्य | **प्रा. डॉ. नलिनी भगत** | 47 |
| 9 | भारतीय स्वातंत्र चळवळीत क्रांतीकारक व्यक्ती आणि त्यांचे विचार यांचे ऐतिहासिक अध्ययन | **प्रा.डॉ. एन. आर. वर्मा** | 53 |
| 10 | पंतप्रधान राजीव गांधीं : विकासदृष्टी व आव्हानांचे ऐतिहासिक अवलोकन | **डॉ. शरद बाबुराव सोनवणे** | 61 |
| 11 | भारतीय स्वतंत्रता आंदोलन में क्रांतिसिंह नाना पाटील का योगदान | **प्रा. पिंकी जगताप** | 72 |

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

# म.गांधी : स्वातंत्र्य आंदोलनातील योगदान

प्रा. डॉ.आंधळे बी.व्ही.
राज्यशास्त्र विभाग कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ जि.परभणी,
bvandhale@gmail.com

**प्रस्तावना:-** भारताला स्वातंत्र्य प्राप्त होऊन आज पंच्याहत्तर वर्ष पूर्ण होत आहेत.त्यामुळेसर्वत्र भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला जात आहे.त्यानिमित्तानेकला,साहित्य,संस्कृती, विज्ञान, संशोधन आदी क्षेत्रात स्वातंत्र्य आंदोलनाच्या आठवणींना उजाळा दिला जात आहे.भारतीयस्वातंत्र्याचा इतिहास आजही तितकाच प्रेरणादायी आणि स्फुर्तीदायी आहे जितका तो तात्कालीन परिस्थितीत होता.भारतीयस्वातंत्र्य आंदोलनाचे वेगवेगळया टप्प्यात वर्गीकरण केले जाते.त्यातीलगांधी युग (१९२०-१९४७) हे राष्ट्रपिता महात्मा गांधीयांच्या नेतृत्वाखाली चालविलेल्या विविध आंदोलनांचा काळ आहे.ब्रिटीश साम्राज्याच्या विरोधातम.गांधींनीजे प्रमुख आंदोलने केली त्यांचा संशोधनात्मक आढावा प्रस्तुत शोधनिबंधातून घेतला जाणार आहे.

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाची खरी सुरुवात१८५७च्या स्वातंत्र्याच्या उठावाने झाली.पण यांत भारतीयांना अपयश आले.त्यामुळे पुढील काळात स्वातंत्र्यासाठी अनेकांनी आपले योगदान दिले.यांत क्रांतिकारक,मवाळवादी,जहालवादी,आदिवासी, शेतकरीआदी लोकांचा सहभाग आहे.परंतु यांतम.गांधीयांनी जे योगदान दिले आहेते अद्वितीय असे आहे.सुभाषचंद्र बोस महात्मा गांधी संबंधी म्हणतात, " या युगातला लोकांचा राजा बघायचा असेल तर गांधीजी कडेच बघायला हवं राज्य नसलेला,राजप्रसाद नसलेला केवळ जाड्या भरड्याखादीच्या पंचात आणि उपरण्यात वावरणारा असा उघडा वाघडा राजा. याच्या हातातली काठी हाच या राजाचा राजदंड."एकुणचमहात्मा गांधी यांनी भारतीय स्वातंत्र्याचे नेतृत्व करून भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. तेव्हापासून भारतीयांच्या मनामनावर अधिराज्य गाजवणारी व्यक्ती जर कोणती असेल तर ती म्हणजे राष्ट्रपिता

महात्मा गांधी ही होय. महात्मा गांधींच्या नेतृत्वाने केवळ भारतीयांनाच नाही तर संपूर्ण जगाला स्वातंत्र्याची नवी परिभाषा शिकवली. त्यांच्या या कार्याचा आढावा पुढील काही महत्त्वपूर्ण आंदोलनांच्या माध्यमातून घेतला आहे.

**असहकार आंदोलन:-** १ ऑगस्ट १९२०रोजी म.गांधींनी ब्रिटिश सरकारच्या विरोधात असहकार आंदोलनाची घोषणा केली.भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील एक महत्त्वाचे राष्ट्रीय आंदोलन म्हणून असहकार आंदोलनाचा उल्लेखकरता येईल.कारण म.गांधींनी चालविलेल्या असहकार आंदोलनाने एकानव्या युगाची सुरुवात झाली होती.म.गांधीचे हे पहिलेच राष्ट्रीय आंदोलन आहे.१९१९मध्ये ब्रिटिशांनी भारतीयांना विना चौकशी अटक करणारा रौलेट ॲक्ट लागू केला.ज्याला गांधींनी काळा कायदा ( Black Bill) असे म्हटले आहे.ब्रिटीश सरकारच्या या अमानुष कायद्याला विरोधकरुन सरकारला वठणीवर आणण्यासाठी असहकार आंदोलनाची घोषणा करण्यात आली.

असहकार(Non- Coperation) म्हणजे सरकारला कोणतेही सहकार्य न करणे.४सप्टेंबर१९२०रोजी कलकत्ता येथील राष्ट्रीय सभेच्या खास अधिवेशनात म.गांधींनी आपला असहकार आंदोलनाचा कार्यक्रमजाहीर केला.यात संघर्षात्मक व विधायक अशा दोनप्रकारच्या उद्दिष्ट्ये आखली होती.

**असहकार आंदोलनाचीउद्दिष्टे**

१) भारतीय लोकांनी सरकारी पदव्या व नोकर्याचा त्याग करावा.

२) सरकारी दरबार व समारंभ यांच्यावर बहिष्कार टाकणे.

३) सरकारी शाळा महाविद्यालयावर बहिष्कार टाकून स्वदेशी शाळा महाविद्यालयात प्रवेश घेणे.

४) सरकारी न्यायालयात न जाता खाजगी निवाडा मंडळात तंटे सोडवणे.

५) परकीय मालावर आणि वस्तू यांच्यावर बहिष्कार टाकणे.

६) स्वदेशी खादीच्या कापडाचा वापर करणे.

७) हिंदूमुस्लिम ऐक्य टिकवून ठेवणे.

८) दारूबंदीची अमंल बजावणी करणे.

९) अस्पृश्यता निर्मुलन कार्यक्रम राबविणे

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth 431516 Tq. Sonpeth Dist. Parbhani



संघर्ष संघर्षात्मक कार्यक्रमातून ब्रिटिशांना कोणतेही सहकार्य न करणे शासकीय कामात अडथळे निर्माण करणे आणि विधायक कार्यक्रमातून भारतीयांमध्ये एकात्मतेचे वातावरण तयार करणे हा उद्देश महात्मा गांधींनी आपल्या असहकार आंदोलनांच्या माध्यमातून जनतेपुढे ठेवला होता सी आर दास मोतीलाल नेहरू लाला लजपत रायवल्लभभाई पटेल राजगोपालाचारी राजेंद्र प्रसाद या राष्ट्रीय नेत्यांनी आपला वकिली व्यवसाय त्याग केला तसेच गांधींनीकैसर्य हिंद ही पदवी त्याग केली टिळकांच्या स्मरणार्थ 15 लाख रुपया स्वदेशी फंड गोळा करण्यात आला एकूणच संपूर्ण भारतभरअसहकार आंदोलनाने लोकांच्या मनात राष्ट्रीय चेतना निर्माण केली परंतु 5 फेब्रुवारी 1922 रोजी उत्तर प्रदेशातील गोरखपूर जिल्ह्यातील चौरी चौरा या ठिकाणी ब्रिटिश शासनाच्या अन्याय व दडपशाहीचा संताप येऊन 3000 भारतीय जवान जमावाने पोलीस चौकीवर हल्ला केला आणि त्यात 21 पोलीस आणि एक अधिकारी जळून मेले या हिंसात्मक घटनेमुळे महात्मा गांधींनी संपूर्ण देशभर पेटलेले असहकारतेचे आंदोलन संस्था गीत करण्याचे आदेश दिले.

**सविनयकायदेभंगाची चळवळ :-** भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीत१९२७-१९३९हा कालखंड अतिशय महत्त्वाचा मानला जातो या काळात एकीकडे महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली अहिंसक आंदोलन सुरू होते तर दुसरीकडे क्रांतिकारकही आपल्या परीने ब्रिटिशांच्या विरोधात आंदोलन करत होते गांधीजींच्या उठावाच्या तंत्रानुसार नैतिक अधिष्ठान उपलब्ध करूनअसहकारतेचे आंदोलन पुढे चालवण्यात आले. आठ नोव्हेंबर 1927 रोजी ब्रिटनचे पंतप्रधान सर यांचे मॅकडोनाल्ड यांनी एक साथ सदस्य असलेली समिती केली या समितीच्या अध्यक्षपदी सर जवान सायमन यांची नियुक्ती करण्यात आली या समितीमधील सर्व सदस्य ब्रिटिश होते एकही सदस्य भारतीय नव्हता म्हणून आरंभापासूनच या समितीच्या विरुद्ध भारतीयांनी जनमत तयार केले आणि सायमनकमिशनवर बहिष्कार घालण्याचे ठरविण्यात आले 3 फेब्रुवारी 1928 रोजी सायमन कमिशन मुंबईत आले त्यावेळेस भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने काळे झेंडे दाखवत गो बॅकसायमनसायमन परत जा अशा घोषणा देऊन या कमिशनला विरोध केला.

नेहरू अहवालात ब्रिटिश सरकारला सांगितले होते की जर अहवाल स्वीकारला गेला नाही तर काँग्रेस असहकार आंदोलन सुरू करेल परंतु महात्मा गांधींनी दोन मार्च 1930 रोजी व्हॉइस लॉर्ड अरविंद यांना पत्र लिहून ब्रिटिश

राजवटीतील वाईट कायदे काढून टाकण्यास सांगितले आणि याच पत्रात गांधींनी लिहिले की आपण गुजरात मधील समुद्रकिनाऱ्यावरील दांडी या गावी मीठ निर्माण करणार आहोत तथापि जर आपल्या या मागण्या मान्य झाल्या नाहीत तर आपण सरकार विरुद्ध सविनय कायदेभंगाची आंदोलन उभारू गांधींनी सरकारला पुढील गोष्टीवर बंदी घालण्याची विनंती केली होती.

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

१) दारू व इतर मादक पदार्थावर बंदी
२) रुपया व स्टर्लिंगयांच्यातील प्रमाण बदलणे
३) जमीन महसुलीचे दर कमी करणे
४) मिठावरचा कर रद्द करणे
५) लष्करावर होणारा खर्च कमी करणे
६) प्रशासनावर होणारा खर्च कमी करणे
७) परदेशी कपड्यावर आयात कर लावणे
८) गुप्तहेर खाते रद्द करून त्या खात्याचे नियंत्रण लोकांकडे देणे
९) टपाल आरक्षण मान्य करणे
१०) सर्व राजकीय कैद्यांची मुक्तता करणे
११) जनतेला आत्मसंरक्षणार्थ हत्यार वापरण्याची परवानगी देणे

१२मार्च १९३०रोजी आपल्या निवडक ७८सहकार्यासोबतम.गांधींनीदांडी यात्रा सुरू केली.साबरमतीते दांडी हे अंतर २००मैल आहे.हेअंतर पायी चालत ५एप्रिल १९३०रोजी पुर्ण केले.६एप्रिल १९३०च्या पहाटे म.गांधीव त्यांच्या इतर लाखो अनुयायांनीमीठ हातात घेऊन ब्रिटिश सरकारने केलेला कायदा मोडला.यावेळी ब्रिटिश सरकारने गांधीसह अनेक नेत्यांना अटक केली.जवळपासएक वर्ष हे आंदोलन चालले.

सायमन कमिशनने आपला अहवाल मे१९३० प्रसिद्ध केला. या अहवालावर चर्चा करण्यासाठी ब्रिटिश सरकारने भारतीय प्रतिनिधींना इंग्लंडला आमंत्रित केले. यालाच गोलमेज परिषद असे म्हणतात. या गोलमेजपरिषदांच्या एकूण तीन फेऱ्याझाल्या. पहिली फेरी १ डिसेंबर १९३०ते १९जानेवारी१९३१ यादरम्यान झाली.दुसरी गोलमेज परिषद ७ सप्टेंबर१९३१ते१डिसेंबर१९३१आणि तिसरी गोलमेज परिषद१७नोव्हेंबरते २४नोव्हेंबर१९३२या दरम्यान झाली.दुसर्या गोलमेज परिषदेला म.गांधीउपस्थित होते.

**चले जावआंदोलन:-** १ सप्टेंबर १९३९ रोजी जर्मनीने पोलांडवर आक्रमण केले. आणि दुसऱ्या जागतिक महायुद्धाला सुरुवात झाली.३ सप्टेंबर १९३९रोजी पोलांडच्या संरक्षणासाठी ब्रिटनने जर्मनीविरुद्धयुध्दपुकारले. ब्रिटनने युद्धात उडी घेतल्याबरोबर काही तासातच भारताचे तात्कालीन व्हाईसरॉय लॉर्ड लिंनलिथगो यांनी भारत ब्रिटनच्या बाजूने युद्धात उतरण्याचे जाहीर केले.

कोणत्याही साम्राज्यवादी युद्धात भारताला गुंतवण्यास काँग्रेसने विरोध केला. भारतीय जनतेच्या मान्यते शिवाय भारतीयांना युद्धात उतरवणे हे गांधींना सुद्धा पटले नाही.म.गांधींनीब्रिटिश सरकारच्या या निर्णयाचाविरोध केला.

दुसरे महायुद्ध सुरू झाल्यानंतर काही महिन्यातच इंग्लंडची अवस्था अतिशय केविलवाणी झाली. ब्रिटिश राज्यकर्ते भारतीयांच्या हाती सत्ता सोपवण्यास तयार नाहीत हे क्रिप्स वाटाघाटीवरून सिद्ध झाले होते. तेव्हा भारतीयांना लवकरात लवकर स्वातंत्र्य मिळावे म्हणून महात्मा गांधी यांनी हरिजनसप्ताहिकात ब्रिटिश सरकारलाआवाहन केले," ईश्वराच्या नावे आपण भारत सोडून जा. हे शक्य नसेल तर भारतात अराजक निर्माण करून भारत सोडा परंतु भारत जपानसाठी सोडू नका. तो भारतीयांसाठीच सोडा."

७ आणि ८ ऑगस्ट१९४२च्या मुंबई येथे भरलेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात"भारत छोडो"(चले जाव) आंदोलनाचा ठराव मंजूर करण्यात आला. शांतता व अहिंसात्मक मार्गाने प्रत्येकाने हे आंदोलन चालवावे असे गांधींनी जाहीर केले.९ ऑगस्ट १९४२ रोजी महात्मा गांधी सह ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या सर्व सभासदांना ब्रिटिश सरकारने अटक केली. तेव्हा महात्मा गांधींनीकरेंगे या मरेंगे अशी घोषणा देऊन ब्रिटिशांना भारत सोडून जाण्यास सांगितले.

ब्रिटिश सरकारने चले जाव आंदोलन दडपून टाकण्याचे सुरुवातीपासूनच प्रयत्न केले. यासाठी देशातील जवळपास ६०,००० लोकांना अटक करण्यात आली. तसेच १८ हजार लोकांना विना चौकशी स्थानबद्ध करण्यात आले.अश्रुधुर,लाठीमार यांचा सर्रास वापर करण्यात आला. एकंदरीत सरकारच्या या दडपशाही मुळे १०२८ लोक मृत्युमुखी पावले. तर ३००० लोक जखमी झाले. सरकारच्या या दडपशाही चा निषेध करण्यासाठी महात्मा गांधी

Late Ganesh Warpudkar ACS College Sonpeth Dist. Parbhani

यांनी ९ फेब्रुवारी १९४३ पासून २१ दिवसांचे उपोषण सुरू केले. यामुळे त्यांची प्रकृती बिघडली. परंतु ६मे१९४४ रोजी ब्रिटिश सरकारने महात्मा गांधीसह अनेक काँग्रेस नेत्यांची सुटका केली.

**समारोप :-** भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील महात्मा गांधींचे योगदान लक्षात घेता सर्व भारतीय जनतेने त्यांना राष्ट्रपिता ही पदवी बहाल केली.१९१५ ते १९४८ या दरम्यान भारतात भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचे नेतृत्व महात्मा गांधी यांनी केले. एक स्वातंत्र्य योद्धा, समाज सुधारक, शिक्षण तज्ञ, राजकीय विचारवंत, अस्पृश्यता उद्धारक,अर्थतज्ञ, सत्य अहिंसेचा पुजारी,सर्वोदयाचा उपासक, धर्मचिकित्सक, ऑगस्टक्रांतीचे प्रणेते, महामानव अशा विविध विशेषणांनी महात्मा गांधी यांना ओळखल्या जाते.

भारतीय स्वातंत्र्य आंदोलन हे एका विशिष्ट वर्गाची मक्तेदारी होती. त्याला सर्वसामान्य लोकांपर्यंत नेण्याचे कार्य महात्मा गांधी यांनी केले.शेतकरी, कामगार भूमीहीन,स्त्रिया, सामान्य जनता देश विदेशातील भारतीय लोकांना भारतीय स्वातंत्र्याबद्दल आपुलकी निर्माण करणारे थोर स्वातंत्र्य सेनानी म्हणून महात्मा गांधींचा उल्लेख करावा लागेल.

लोकमान्य टिळकांचा मृत्यू झाला आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व गांधीजीकडेआले. टिळकांच्या पिढीतील अनुभवी पुढारी हायात असताना गांधीजींचा चळवळीतील प्रवेश हा जुन्या जाणत्या पुढाऱ्यांच्या मानाने खूप अलीकडचाहोता. परंतु अशाही परिस्थितीत महात्मा गांधी यांनी भारतीय स्वातंत्र्याच्या नेतृत्वाची ही पोकळी अल्पावधीत भरून काढली.

गांधीजींनी स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व केलं आणि भय हा शब्द भारतीयांच्या शब्दकोशातून हद्दपार झाला. ना कारागृहाचे भय, ना बंदुकीच्या गोळयांचे भय. शौर्य आणि अन्यायाच्या प्रतिकार करायला भारतीयांना शिकवले. अत्याचारापुढे असाहाय्य झालेल्या माणसाला गांधींनी आत्मशक्तीचा भान दिलं. म्हणून गांधींचा स्वातंत्र्य लढा हा जगात तीन स्वातंत्र्यलढ्यापेक्षा वेगळा व निराळा असा आहे.गांधीजींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यलढायापेक्षा खूप वेगळा होता त्यात विध्वंसालास्थारा नव्हता.विधायक मार्गाने चालायला शिकवणारा हा स्वातंत्र्य

लढा आहे.तसेचनवनिर्माण, रचनात्मक कार्याचे धडे देणारा हा लढा आहे.म्हणूनअसे म्हणता येईल की, महात्मा गांधींनीस्वातंत्र्यलढ्याला रचनात्मक कार्याची जोड दिली.देशभर रचनात्मक संस्थांचं जाळ विणलं.

जगाला सशस्त्र क्रांती हा एकच मार्ग माहित होता. परंतु कधी लपूनछपून केलेल्या हत्या आणि कधी सैन्याने केलेलेयुद्धजगानंपाहिलेहोते.पण अहिंसा व सत्य ह्या उच्च मूल्यांना प्रतिष्ठा प्राप्त करून ब्रिटिशांसारख्या साम्राज्यवादी सत्तेला देशसोडून जाण्यास भाग पाडले.

**संदर्भसूची**

१) एकविसाव्या शतकात गांधी- वासंती सोर

२) प्रकाश यात्रा - शांतिलाल भंडारी

३) गांधीजी महात्मा आणि राष्ट्रपिता– जे.आर.कोकंडाकर

४) स्वराज्य दिशा आणि दर्शन – सु.श्री.पांढरीपांडे

५) www.lokstta.com

६) www.bbc.com

७) साधना साप्ताहिक

८) आधुनिक भारताचा इतिहास- मोरवंचीकर

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani